VOL- IX ISSUE- X OCTOBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययन

**प्रा.प्रदीप बळवंत पाटील**
सहाय्यक प्राध्यापक
शिक्षणशास्त्र विभाग
कर्मवीर हिरे महाविद्यालय,गारगोटी

प्रौढ शिक्षणाचा विचार सर्वप्रथम माल्कम (Malcolm) यांनी केल्याचा आपल्या लक्षात येते. त्यांनी Andragogy ही संकल्पना सर्वप्रथम वापरली. Andragogy म्हणजे " प्रौढांना अध्यापन करण्याची कला आणि शास्त्र होय." Andragogy हा शब्द ग्रीक शब्द andr(Man) + agogos (Leader of) म्हणजेच "Leading Man" असा तयार झाला आहे. Andragogy ही संकल्पना बाल शिक्षणाहून वेगळी आहे. ही संकल्पना समजण्यासाठी सर्वप्रथम आपणास प्रौढ व्यक्तींच्या शिक्षणाशी संबंधितआढळणारी काही वैशिष्ट्ये लक्षात घ्यावी लागतील ती पुढील प्रमाणे. ("Andragogy," 2022)

- स्वयं निर्देशित शिक्षणास प्राधान्य
- अध्ययनाची जीवन अनुभवांची सांगड घातली जाते.
- विविध भूमिका सांभाळत शिकण्याची इच्छा.
- अध्ययनाचा उपयोग वास्तविक जीवनातील परिस्थिती हाताळणे आणि समस्या सोडविण्यासाठी केला जातो.
- प्रौढ व्यक्तींच्या मध्ये अध्ययन संदर्भात अंतर्गत प्रेरणा असते.

वरील वैशिष्ट्यांचा विचार करता आपल्या असे लक्षात येते की, बाल शिक्षण आणि प्रौढ शिक्षण यामध्ये निश्चित स्वरूपाचा फरक आहे. (Pappas, 2013)

**प्रौढ शिक्षणाची तत्वे :**

- प्रौढांना शिकण्याची इच्छा असणे आवश्यक आहे.
- प्रौढ तेच शिकतील जे त्यांना शिकण्याची गरज आहे.
- प्रौढ व्यक्ती कृतीतून शिकतात.
- प्रौढ शिक्षण समस्या केंद्रित असून, समस्या सोडविण्यावर लक्ष केंद्रित करते.
- अनुभवाचा प्रौढांच्या शिक्षणावर परिणाम होतो.
- प्रौढ व्यक्ती अनौपचारिक अध्ययन वातावरणात उत्तम शिकतात.
- प्रौढांना अध्ययन प्रक्रियेत स्वतःला समान भागीदार म्हणून मार्गदर्शकांनी स्वीकारावे असे वाटते.

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार प्रौढ शिक्षण आणि निरंतर अध्ययन :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रौढ आणि निरंतर शिक्षणासंदर्भात सर्वंकष विचार करण्यात आला आहे. कारण देशाच्या सर्वांगीण प्रगती मध्ये देशातील सर्व नागरिकांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे यासाठी त्या देशातील प्रत्येक नागरिक साक्षर असणे, प्रत्येकाला शिक्षणाची संधी प्राप्त होणे तसेच त्या नागरिकांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी महत्त्वपूर्ण असते. साक्षरता ही व्यक्तीच्या वैयक्तिक, नागरी, आर्थिक विकासासाठी गरजेची असते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण यामध्ये असे म्हटले आहे की, जगभरातील देशांच्या माहितीवरून हे दिसून येते की साक्षरतेचे प्रमाण आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्न (GDP) यामध्ये अतिशय धन संबंध आहे. (*MARATHI.Pdf*, n.d.)

**प्रौढ आणि निरंतर अध्ययनाची आवश्यकता :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रौढ आणि निरंतर अध्ययनाची आवश्यकता अधोरेखित केली आहे व्यक्तीला दैनंदिन जीवनातील व्यवहार पूर्ण करण्यासाठी साक्षर असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये विविध कारणांसाठी व्यक्तीची साक्षरता आवश्यक मानली आहे ती कारणे पुढीलप्रमाणे :

- आर्थिक व्यवहार करणे.
- वस्तूंचा दर्जा तपासणे/ तुलना करणे.
- नोकरी, कर्ज, शासकीय कागदपत्रे यासाठी अर्ज करणे.
- सार्वजनिक परिपत्रके आणि बातम्यांमधील लेखांचा अर्थ समजणे.
- संवाद साधण्यासाठी पारंपारिक आणि आधुनिक माध्यमांचा उपयोग करणे.
- भारताचा नागरिक म्हणून आपले मूलभूत हक्क आणि कर्तव्य यांची जाणीव होण्यासाठी.

**प्रौढ आणि निरंतर शिक्षणाची कार्यवाही :**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये असे सांगितले आहे की, प्रौढ आणि निरंतर शिक्षणाच्या कार्यवाहीसाठी समाजाचा गतिशील सहभाग व स्वयंसेवी वृत्ती महत्त्वाची आहे. तसेच राजकीय इच्छाशक्ती, संघटनात्मक रचना, योग्य नियोजन, पुरेसे आर्थिक पाठबळ, शिक्षक व स्वयंसेवी संस्था यांचा कृतीयुक्त सहभाग आवश्यक आहे. या योजनेच्या यशस्वी कार्यवाहीसाठी समाजातील नोंदणी न झालेल्या व शाळा सोडलेल्या विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात समाविष्ट करून घेण्यासाठी प्रयत्न केले जातील. त्यासाठी शिक्षक, समाजसेवक व समुपदेशक यांची मदत घेतली जाईल.

1988 मध्ये स्थापन करण्यात आलेले राष्ट्रीय साक्षरता मिशन हे स्वयंसेवी सहभाग आणि लोकांच्या पाठिंब्यावर अवलंबून होते. या मिशनचा परिणाम म्हणून 1991 ते 2011 या काळात स्त्रियांमधील साक्षरतेच्या प्रमाणासह राष्ट्रीय साक्षरतेचे प्रमाण लक्षणीय वाढले होते.

**प्रौढ शिक्षण आणि NCERT ची भूमिका:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रौढ शिक्षणाच्या संदर्भात NCERT या संस्थेला प्रौढ शिक्षणाचा एक उत्कृष्ट अभ्यासक्रम आराखडा विकसित करण्यास सांगितला आहे या आराखड्यामध्ये पुढील बाबींचा समावेश असावा अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

- मूलभूत साक्षरता आणि संख्याज्ञान
- महत्त्वाची जीवन कौशल्य( आर्थिक साक्षरता, डिजिटल साक्षरता, व्यावसायिक कौशल्य, आरोग्य, बाल संगोपन आणि कुटुंब कल्याण)
- व्यवसायिक कौशल्यांचा विकास
- मूलभूत शिक्षण( शालेय शिक्षणाची समकक्ष)
- निरंतर अध्ययन

**प्रौढ आणि निरंतर अध्ययनासाठी स्त्रोत केंद्रे:**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 नुसार प्रौढ आणि निरंतर अध्ययनासाठी पर्याप्त पायाभूत सुविधा उपलब्ध असलेल्या शाळा (ICT सुविधा) , सार्वजनिक वाचनालये, उच्च शिक्षण संस्था (HEI) आणि प्रौढ शिक्षण केंद्रे या ठिकाणी उपलब्ध कुशल मनुष्यबळ व सुविधांचा वापर करून प्रौढ आणि निरंतर अध्ययन हे चालू राहील.

थोडक्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये प्रौढ आणि निरंतर शिक्षणाचा सर्वांगीण विचार केल्याचे आपल्या लक्षात येते. कोणतेही धोरण यशस्वी होण्यासाठी व त्या धोरणाची उद्दिष्टे साध्य होण्यासाठी त्या धोरणासंदर्भात धोरण निश्चित करणारे, धोरणाची अंमलबजावणी करणारे घटक आणि धोरणाचे प्रत्यक्ष लाभार्थी यांच्यामध्ये योग्य समन्वय असणे गरजेचे असते. तरच ते धोरण यशस्वी होते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे आणि निरंतर अध्ययनाच्या बाबतीत किती प्रमाणात यशस्वी ठरले हे येणाऱ्या काळात आपल्या लक्षात येईल.

**संदर्भ :**

1. Andragogy. (2022). In *Wikipedia*. https://en.wikipedia.org/w/index.php?title=Andragogy&oldid=1113531378
2. *MARATHI.pdf*. (n.d.). Retrieved October 19, 2022, from https://www.education.gov.in/sites/upload_files/mhrd/files/nep/2020/MARATHI.pdf
3. Pappas, C. (2013, May 9). *The Adult Learning Theory—Andragogy—Of Malcolm Knowles*. ELearning Industry. https://elearningindustry.com/the-adult-learning-theory-andragogy-of-malcolm-knowles